प्रशासकीय मान्यता

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राहता लोहारे मांडावा पारनेर श्रीगोंदा रस्ता (रा.मा. ६७) कि.मी ६०/७०० ते ६१/००, ६१/८०० ते ७१/००, ७२/०० ते ७२/६०० मध्ये सुधारणा करणे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक पीएलएन-२०२१/सी.आर.१०००/नि-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ०१/०३/२०२१

शासन निर्णय:- अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राहता लोहारे मांडावा पारनेर श्रीगोंदा रस्ता (रा.मा. ६७) कि.मी ६०/७०० ते ६१/००, ६१/८०० ते ७१/००, ७२/०० ते ७२/६०० मध्ये **सुधारणा करणे.** या रुपये ७,००,००,०००/- (रु. **सात कोटी मात्र**) अंदाजित खर्चाच्या बांधकामास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाचा वाव खालीलप्रमाणे आहे:-

१) रुंदीकरण, मातीभराव, खडीकरण, मजबूतीकरण, डांबरीकरण

२) मुरुम बाजूपट्टी, कच्चे गटर्स, कॉंक्रीट रस्ता, ४ नविन पाईप मोऱ्यांचे बांधकाम

३) संकिर्णबाबी

२. ज्या कामास या निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे त्या कामास विचाराधीन असलेल्या नियोजित कोणत्याही पाटबंधारे / जलविद्युत पाणी पुरवठा प्रकल्पामुळे बाधा येत नाही किंवा हे काम अशा योजनांच्या जलाशयाखाली येणार नाही, अशा अर्थाचे योग्य नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित मुख्य अभियंता यांनी प्रतिस्वाक्षरित केलेले नसून ते या प्रकल्पाच्या कागदपत्रात समाविष्ट नाही.

क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी या कामाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात करण्यापूर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे / जलविद्युत पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामुळे या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची खात्री करून घेतली पाहिजे या अटीवरच ही प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरहू कामाचा प्रस्ताव तयार करताना कामाचे समर्थन व आवश्यकता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील / पत्रातील सूचनांचे अनुपालन, या सर्व बाबींचा क्षेत्रीय पातळीवर विचार करण्यात आलेला आहे व प्रस्तावाची क्षेत्रीय पातळीवर सर्व तांत्रिक दृष्टीकोनातून छाननी करण्यात आलेली आहे, अशी धारणा आहे. तथापि, तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबींची पुन्हा एकदा खातरजमा करून घेण्यात यावी.

४. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी व काम सुरू करण्यापूर्वी पुढील बाबींची पुर्तता करण्यात यावी या अटीवरच ही प्रशासकीय **मान्यता** देण्यात येत आहे.

i. *अंदाजपत्रकातील दराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक-डिएसआर१०१०/सीआर-६४५ब/नियो-३, दिनांक-१४/०७/१९९३ व जीईएन-१०२००१/सीआर-३/नियोजन-३, दिनांक २२ फेब्रुवारी २००१ मधील तरतूदींचे अनुपालन झाले असल्याबाबत खात्री करून घेण्यात यावी.*

ii. *डांबरीकरणाच्या तरतूदी सा.बां.वि. परिपत्रक क्र-संकीर्ण-२०७/प्र.क्र.२५७/रस्ते-१ दिनांक २१ जानेवारी २००८, क्र-संकीर्ण-२००१/प्र.क्र.११६/रस्ते-१ दिनांक ०४ डिसेंबर २००१ व क्र-संकीर्ण-२०१४/प्र.क्र.०६/रस्ते-१ दिनांक २६/५/२०१४ व दिनांक ०७ ऑगस्ट २०१४ नुसार आहेत याची खात्री तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याने करावी.*

iii. **रस्ते व पुल बांधकामासाठी ज्या ठिकाणी वन व पर्यावरण व अन्य विभागांची (MCZMA/NCZMA) मान्यता मिळविण्यासाठी आवश्यक त्या अटी पूर्ण करण्यात याव्यात. त्यासाठी संबंधीत संस्थाकडे अर्ज करण्याची जबाबदारी संबंधीत अधिक्षक अभियंता यांची राहील व अशी परवानगी प्राप्त झाल्यानंतरच संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याने नकाशास व अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता द्यावी.**

**... करण्यात यावी. ही जबाबदारी संबंधीत कार्यकारी**

vi. कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करताना अस्तित्वातील बांधकाम पाडल्यानंतर मिळणाऱ्या सामुग्रीच्या किंमतीचा विचार अंदाजपत्रकात यथोचितपणे करण्यात यावा.

vii. कामास वन जमिनीची आवश्यकता असल्यास संबंधीत प्राधिकरणाची परवानगी घेण्याची जबाबदारी तांत्रिक मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्याची असेल. वन जमिन ताब्यात मिळाल्याशिवाय डांबरीकरणाचे/काँक्रीटीकरणाचे काम सुरु करण्यात येऊ नये.

viii. राज्यदरसुची २०२०-२१ मधील General Note च्या अनुषंगाने बांधकाम कालावधी करीता आवश्यक सर्वसाधारण विम्याची तरतूद सादरकर्त्या सक्षम अधिकाऱ्याने प्रस्तावीत केल्यानुसार करण्यात आली आहे. तथापी सदर परिच्छेदानूसार देखभाल दुरुस्ती व दोषदायीत्व कालावधीकरीता विम्याची तरतूद तांत्रीक मान्यता प्रदान करणारे सक्षम अधिकारी तांत्रीक मान्यता अंदाजपत्रकाच्या गोषवाऱ्यामध्ये करतील असे ग्राह्य धरण्यात आले आहे. या शर्तीवर सदर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

ix. काँक्रीट रस्त्याच्या संकल्पनास १० कि.मी. लांबीपर्यंत अधिक्षक अभियंता व पुढील लांबीस मुख्य अभियंता यांची मंजूरी अभिलेख्यात ठेवावी.

x. कामासाठी मंजूर निधीच्या मर्यादेच्या अधीन राहूनच खर्च करण्यात यावा.

xi. लहान पूल/ मोठे पूल/ रेल्वे उड्डाणपुलाच्या सर्वसाधारण आखणीस सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी प्राप्त केल्यानंतरच अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात यावी.

xii. प्रस्तावित काम हे शासनाच्या ताब्यातील जागेवरच करण्यात यावे. खाजगी किंवा इतर मालकी जागेत करावयाचे झाल्याचे त्याचे प्रचलित भूसंपादन नियमानुसार लागणारी जमिन संपादीत करुन व जमिनीचा सर्व मोबदला अदा करुन नंतरच कामास तांत्रिक मान्यता प्रदान करावी व त्यानंतरच कामास सुरवात करावी.

xiii. कंत्राटदाराशी करावयाच्या करारनाम्यात रस्ता किंवा पूल याचे संकल्पित आयुर्मान दर्शवून त्या कालावधीत कामात दोष निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदार व संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांची राहील. अशा प्रकरणी कंत्राटदार व संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल" अशा आशयाची अट करारनाम्यात समाविष्ट करावी.

xiv. रस्त्याच्या भौमित्तिक मानकांबाबत शासन परिपत्रक क्र.बिडीएम-१०८७/सीआर-५३०६/नियोजन-३ दि.१३/५/१९८८ मधील तरतूदींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

५. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी सदर रस्ता यासाठी लागणारी जमीन या विभागाच्या ताब्यात आहे याची खातरजमा करून घ्यावी.

६. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दराचे वर्णन/दर/दर पृथ:करणातील गृहीत धरलेली अंतरे व अनुषंगिक इतर बाबी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात शासनाचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही.

७. तांत्रिक मान्यता प्रदान करतांना प्रशासकीय मान्यतेतील वाव अन्य कोणत्याही योजनेत/कार्यक्रमात समाविष्ठ नाही. याची खातरजमा तांत्रिक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांने करावी.

८. सदर कामावरील खर्च **"५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च, ०३ राज्यमार्ग"** या शिर्षाखाली दाखवण्यात यावा.

९. या कामासाठी अर्थसंकल्पात विशिष्ठ तरतूद असल्याशिवाय हे काम सुरू करण्यात येवू नये.

१०. हा शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभागातील उप सचिव (रस्ते) यांच्या अनुमतीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(विवेक कांबळे)**
कार्यासन अधिकारी

प्रत,
महालेखापाल-१ व २, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
महालेखापाल-१ व २, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक **(मंजूर नकाशे व अंदाजपत्रकाच्या प्रतीसह)**
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अहमदनगर
जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अहमदनगर
मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे स्वीय सहाय्यक
मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे स्वीय सहाय्यक
कार्यासन अधिकारी, अर्थ-१/नियोजन-१/रस्ते-५, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई